**सं.फौ.ख.क्र.१९१/२०२१**

**लक्ष्मी स्प्रे पेटिंग वि. तिरूपती ट्रान्सलाईन.**

**<u>नि.क्र.४९ खालील आदेश</u>**

फिर्यादी यांनी सदरचा अर्ज कॅनरा बँक शाखा, वालचंदनगर यांचेकडील मॅनेजर /माहितदार इसम यांनी चालू खाते क्र.०२७५२०१०००३५२ व बचत खाते क्र.०२७५१०१००८५९२ मधून तिरूपती ट्रान्सलाईन ॲण्ड कंपनी यांचेबरोबर दि.०१/०१/२०१७ ते दि.३१/१२/२०२० पर्यंतचे झालेल्या व्यवहाराबाबतची संपूर्ण मुळ कागदपत्रे घेवून यावेत याकामी साक्षी समन्स काढण्यात यावेत यासाठी दाखल केलेला आहे.

२. फिर्यादी यांचा अर्ज, आरोपी क्र.२ व ३ यांचे म्हणणे यांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

३. प्रस्तुत प्रकरण हे फिर्यादी यांनी परक्राम्य संल्लेख अधिनियम कलम १३८ प्रमाणे दाखल केलेले आहे. प्रकरणाचा गुणदोषावर निकाल होण्यासाठी फिर्यादीच्या मागणीप्रमाणे साक्षीसमन्स काढणे योग्य व संयुक्तीक होईल. फिर्यादीच्या मागणीप्रमाणे साक्षीसमन्स काढल्यास आरोपी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. आरोपी यांना साक्षीदाराचा उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता फिर्यादीचा अर्ज मंजूर करणे संयुक्तीक होईल. करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

अर्जातील मागणीप्रमाणे साक्षी समन्स काढण्यात यावेत.

PATIL ATUL BHIMRAO
Digitally signed by PATIL ATUL BHIMRAO
Date: 2026.08.28 17:01:56 +0530

**( ए. बी. पाटील)**

**दि.२८/०८/२०२६** न्यायदंडाधिकारी वर्ग–१, इंदापूर.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करतो की, या पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नाव | उमेश वाय.भगत |
| न्यायालयाचे नाव | श्री. ए. बी. पाटील , ३ रे सह दिवाणी न्यायाधीश तथा न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, इंदापूर. |
| आदेशाची तारिख | २८/०८/२०२६ |
| आदेशावर पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | २८/०८/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | २८/०८/२०२६ |